# महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक : ३/१०/२०१२ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित केलेल्या २४५ व्या बैठकीचे कार्यवृत्त

बाब क्रमांक : २४५/६

विषय :- **Form No.10 and Resolution to be submitted to the Income Tax Department.**

-------------------------------------------

ठराव क्रमांक : ६५८१ दिनांक : २७/०९/२०१२
३/१०/२०१२

Resolved that entire revenue surplus of MHADA for the Assessment Year 2012-13 corresponding to Financial Year 2011-12 shall be utilized / applied on the objects of MHADA during the next five consecutive financial years beginning from 2012-13 and particularly on schemes as mentioned in the Budget for the Financial Year 2012-13 as required U/S. 11 of the Income Tax Act, 1961.

Action on the Resolution to be presented before Authority in the Next Meeting.

**बाब क्रमांक : २४५/१**

**विषय :- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक ७/०९/२०१२ रोजी झालेल्या २४४ व्या बैठकीचे प्रारुप कार्यवृत्त स्थायी करण्याबाबत...**

---------------------

उक्त विषय सचिव/प्राधिकरण यांनी सभागृहापुढे सादर केला.

सचिव / प्राधिकरण यांनी कार्यवृत्तांतातील बाब क्रमांक २४४/७ " नविन चंद्रपूर विकास आराखडा - महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३१ (१) अंतर्गत मंजूर विकास आराखडयामधील फेरबदल प्रस्तावाबाबत " या विषयाचे कार्यवृत्तांतात " यावर सखोल चर्चा होऊन सन्मानीय सदस्यांनी जोपर्यंत संयुक्त पुनर्विकासाबाबत शासन स्तरावर निर्णय होत नाही तोपर्यंत याबाबत निर्णय घेण्यात येणार नसल्याचे सांगितले व सदर बाब पुढे ढकलण्यात आली, " असा मजकूर आला आहे. सदर मजकूर नजरचूकीने आला असून **त्याऐवजी नविन चंद्रपूर विकास आराखडा १९६६ चे कलम ३७(१) अंतर्गत मंजूर विकास आराखडयामधील एकूण १५ फेरबदल प्रस्ताव दिनांक १७/०२/२००९ अन्वये शासनाकडे मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत, परन्तु शासनाने सदर प्रस्तावांना प्राधिकरणाची मंजूरी घेण्याबाबत कळविले असल्याने सदर प्रस्ताव प्राधिकरणाच्या मंजूरीस्तव सादर करण्यात आला असल्याचे सांगितले, असा मजकूर हवा असल्याचे सांगितले व याबाबत ठराव असल्याचे सांगितले.** या सुधारणेस सन्माननीय सदस्यांनी संमती दिली व

बाब टिप्पणीतील प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन प्राधिकरणाने

**ठराव क्रमांक : ६५८२** **दिनांक : ३/१०/२०१२**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला की, नविन चंद्रपूर विकास आराखडयातील महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अंतर्गत मंजूर विकास आराखडयामधील शासनाच्या मंजूरीकरिता दिनांक १७/०२/२००९ अन्वये सादर करण्यात आलेल्या १५ प्रस्तावांना प्राधिकरण मंजूरी देत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता तत्काळ करण्यात यावी.

सुचविलेल्या दुरुस्तीसह सदर कार्यवृत्त एकमताने स्थायी करण्यात आले.

**बाब क्रमांक : २४५/३**

**विषय :- अमरावती मंडळांतर्गत मौजे उमरखेड अकोला येथील स.क्र.१५/१ वरील ६० मध्यम उत्पन्न गटांतर्गत सदनिका बांधकाम योजनेच्या निविदा स्विकृतीबाबतचा प्रस्ताव.**

---------------------------

**ठराव क्रमांक : ६५८३** **दिनांक - ३/१०/२०१२**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला कीं,

अ. अमरावती गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळांतर्गत स.क्र.१५/१ मौजा उमरखेड अकोला येथे म्हाडाने मध्यम उत्पन्न गटांतर्गत ६० गाळयांच्या योजनेच्या बांधकामाकरिता ( रु.३,७३,०८,४७७/- या निविदा रकमेवर ) प्राप्त झालेल्या निविदा देकारापैकी निम्नत्तम देकार देणा-या मे.वेलकीन बिल्डर्स इन्फ्रास्ट्रक्चर लि.इंदौर ( सार्वजनिक बांधकाम विभाग वाशिम,महाराष्ट्र राज्य येथे पंजीकृत ) या कंपनीचा ३.९१ % जास्त असलेला तथा रु. ३,८७,६७,२३८.४५ समजा **रु. ३,८७,६७,२३८/- चा** देकार प्राधिकरणाला प्रदान केलेल्या अधिकार प्रदानतेनुसार स्विकारण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

ब. योजनेतील गाळयांचे बांधकाम तथा कामाचे कार्यादेश गाळयांच्या निश्चित मागणीला अनुसरुन देण्यांत यावेत. मागणीनुसार द्यावयाच्या कार्यादेशाच्या पध्दतीसाठी कंत्राटदाराला कोणतीहि जादा आकारणी अथवा कोणत्याही सबबीखाली अतिरिक्त मोबदला अनुज्ञेय राहणार नाही जसे कीं, योजनेतील एकूण गाळयांची संख्या कमी असल्यास व जेवढी मागणी प्राप्त झाली आहे तेवढया मागणीचे बांधकाम करावयाचे असल्यास त्यामुळे कमी होणारे परिमाण आणि खर्च या कारणामुळे व अन्य कोणत्याही सबबीमुळे मोबदला अनुज्ञेय राहणार नाही, यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता तत्काळ करण्यात यावी.

**बाब क्रमांक : २४५/४**

**विषय :- खातरोड, भंडारा नागपूर येथील ३६ गाळे उच्च उत्पन्न गटाच्या बांधकामाच्या निविदा स्विकृतीचा प्रस्ताव.**

---------------------------

**ठराव क्रमांक : ६५८४** **दिनांक - ३/१०/२०१२**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला कीं,

अ. नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळांतर्गत खातरोड भंडारा येथे म्हाडाने उच्च उत्पन्न गटांतर्गत ३६ गाळयांच्या योजनेच्या बांधकामाकरिता ( रु.४,६५,९८,७७५/- या निविदा रकमेवर ) प्राप्त झालेल्या निविदा देकारापैकी निम्नत्तम देकार देणा-या मे.राज कन्स्ट्रक्शन, या कंपनीचा ४.५६ % कमी असलेला तथा रु. ४,४४,७३,८७०.८६ समजा **रु. ४,४४,७३,८७१/-** चा देकार प्राधिकरणाला प्रदान केलेल्या अधिकार प्रदानतेनुसार स्विकारण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

ब. योजनेतील गाळयांचे बांधकाम तथा कामाचे कार्यादेश गाळयांच्या निश्चित मागणीला अनुसरुन देण्यांत यावेत. मागणीनुसार द्यावयाच्या कार्यादेशाच्या पध्दतीसाठी कंत्राटदाराला कोणतीहि जादा आकारणी अथवा कोणत्याही सबबीखाली अतिरिक्त मोबदला अनुज्ञेय राहणार नाही जसे कीं, योजनेतील एकूण गाळयांची संख्या कमी असल्यास व जेवढी मागणी प्राप्त झाली आहे तेवढया मागणीचे बांधकाम करावयाचे असल्यास त्यामुळे कमी होणारे परिमाण आणि खर्च या कारणामुळे व अन्य कोणत्याही सबबीमुळे मोबदला अनुज्ञेय राहणार नाही, यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता तात्काळ करण्यात यावी.

**बाब क्रमांक : २४५/५**

**विषय :- कोंकण मंडळातील विविध योजनांच्या अंतर्गत वितरीत केलेल्या / करण्यात येत असलेल्या गाळे / भूखंडाच्या विक्रीची देय रक्कम संबंधितांकडून भरण्यास झालेला विलंब क्षमापित करण्याबाबत व सदर प्रकरणांच्या नियमितीकरणास मंजूरी मिळणेबाबत.**

---------------------------

**ठराव क्रमांक : ६५८५** **दिनांक - ३/१०/२०१२**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला कीं, कोंकण मंडळाच्या विविध वसाहतीतील विविध उत्पन्न गटातील वैयक्तीक भूखंडांकरिता १३.५० % दराने व्याज आकारणी व सुविधा भूखंड, व्यापारी भूखंड, शाळा भूखंड तसेच सहकारी संस्था भूखंडांच्या लाभार्थीकडून १८ % दराने व्याज आकारणी करुन रक्कम स्विकारण्यात आलेली आहे. यामध्ये म्हाडाचे कोणतेहि आर्थिक नुकसान होत नसल्याने सदर विलंब क्षमापित करण्यात येऊन यापूर्वी वितरीत केलेल्या आता पर्यंतच्या सर्व प्रकरणांना व यापूढे भूखंड वितरीत करण्यात येत असलेल्या दिनांक ६/१०/२०१२ पर्यंतच्या सर्व प्रकरणांच्या नियमितीकरणास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

सदर ठराव स्थायीकरणाची वाट न पाहता पुढील अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी.

**बाब क्रमांक : २४५/७**

**विषय :- स.क्र.३३/अे, ३३/बी, २४/अे, ३/अे, ३६/११अे, १६/१ आणि १६/२ मौजा कामठी येथील ४७ सदनिका अल्प उत्पन्न गटाचे बांधकाम करण्याबाबत - निविदा स्विकृतीबाबत.**

---------------------------

**ठराव क्रमांक : ६५८६** **दिनांक - ३/१०/२०१२**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला कीं,

अ. नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळांतर्गत स.क्र.३३/अे, ३३/बी, २४/अे, ३४/अे, ३६/११ए १६/१ आणि १६/२ मौजा कामठी येथे ४७ सदनिका अल्प उत्पन्न गट गृहनिर्माण योजनेच्या बांधकामाकरिता ( रु.२,२८,६१,९५७/- या निविदा रकमेवर ) प्राप्त झालेल्या निविदा देकारापैकी निम्नत्तम देकार देणा-या मे.राज कन्स्ट्रक्शन या कंपनीचा वाटाघाटीनंतर ३.१० % जास्त असलेला तथा रु. २,३५,७०,६७७.६६ समजा **रु. २,३५,७०,६७७/-** चा देकार प्राधिकरणाला प्रदान केलेल्या अधिकार प्रदानतेनुसार स्विकारण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे

ब. योजनेतील गाळयांचे बांधकाम तथा कामाचे कार्यादेश गाळयांच्या निश्चित मागणीला अनुसरुन देण्यांत यावेत. मागणीनुसार द्यावयाच्या कार्यादेशाच्या पध्दतीसाठी कंत्राटदाराला कोणतीहि जादा आकारणी अथवा कोणत्याही सबबीखाली अतिरिक्त मोबदला अनुज्ञेय राहणार नाही जसे कीं, योजनेतील एकूण गाळयांची संख्या कमी असल्यास व जेवढी मागणी प्राप्त झाली आहे तेवढया मागणीचे बांधकाम करावयाचे असल्यास त्यामुळे कमी होणारे परिमाण आणि खर्च या कारणामुळे व अन्य कोणत्याही सबबीमुळे मोबदला अनुज्ञेय राहणार नाही,यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता तत्काळ करण्यात यावी.

**बाब क्रमांक : २४५/८**

**विषय :- म्हाड अधिनियम कलम ५२ अ खरेदी केलेल्या स.नं.७०अ/१/१, ७०अ/२, ७०अ/३, ७०ब नेताजीनगर, वानवडी, पुणे येथील पूर्वी बांधलेल्या अल्प व मध्यम उत्पन्न गटातील सुमारे ५८२ सदनिकांच्या वसाहतींतर्गत एकूण क्षेत्र ४६५५० चौ.मि.पैकी शिललक क्षेत्रावरील नियोजित सुमारे २३८१५ चौ.मि. बांधकाम क्षेत्र गृहनिर्माण प्रकल्पाचे काम मे.बी.जी.शिर्के कं.टे.प्रा.लि. यांना टर्नकी तत्वानुसार देण्याबाबत.**

---------------------------

**ठराव क्र. : ६५८७** **दिनांक : ३/१०/२०१२**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला कीं,

१. स.नं.७०अ/१/१, ७०अ/२, ७०अ/३, ७०ब नेताजीनगर, वानवडी, पुणे येथील पूर्वी बांधलेल्या अल्प व मध्यम उत्पन्न गटातील सुमारे ५८२ सदनिकांच्या वसाहतींतर्गत एकूण क्षेत्र ४६५५० चौ.मी. पैकी शिल्लक सुमारे १२००० चौ.मी.क्षेत्रावरील नियोजित सुमारे २३८१५ चौ.मी.बांधकाम क्षेत्र गृहनिर्माण योजना २४ महिन्याच्या कालावधीमध्ये पूर्ण करणेकरिता मे.बी.जी.शिर्के कं.टे.प्रा.लि.यांना टर्नकी तत्वानुसार व शासनमान्य दरानुसार देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. बांधकामासाठी प्रस्तावित प्रती चौ.फुट दर ज्या बांधकाम क्षेत्रावर देय आहे त्याची परिगणना करण्यासाठी मुख्य वास्तुशास्त्रज्ञ व नियोजनकार / प्राधिकरण यांनी तपासणी करुन मुख्य अभियंता-३ / प्राधिकरण यांचे मंजूरी नंतर प्रत्यक्ष कंत्राटदाराला देय क्षेत्र निश्चित करण्यात यावे. यास मान्यता देण्यात येत आहे.

३. मुळ ५८२ सदनिकाधारकांचा या बांधकामाला काही प्रमाणात विरोध असल्यामुळे कोणत्याही कारणास्तव सदर प्रकल्पाचे काम सुरु करण्यात अथवा पूर्ण करण्यामध्ये काही अडथळे निर्माण होवून विलंब झाल्यास त्याबाबत मे.बी.जी.शिर्के कं.टे.प्रा.लि. यांना कोणतीहि नुकसान भरपाई देय राहणार नाही.यास मान्यता देण्यात येत आहे.

४. मेसर्स बी.जी.शिर्के कं.टे.प्रा.लि. यांचेतर्फे मागणी केल्यानुसार कार्यादेश देताना एकूण करार रकमेपैकी १६ टक्के अग्रीम, यासंबंधीच्या अटी, शर्तीनुसार देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता तत्काळ करण्यात यावी.

**बाब क्रमांक : २४५/१०**

**विषय :- स.क्र.१९९/२ (अ) भुसावळ जिल्हा जळगांव येथे
२२ गाळे मध्यम उत्पन्न गट सदनिकांचे बांधकाम.
- निविदेवर निर्णय घेणेस्तव टिप्पणी.**

---------------------------

**ठराव क्रमांक : ६५८८** **दिनांक - ३/१०/२०१२**

प्राधिकरणाने एकमताने निर्णय घेतला कीं, सर्व्हे क्र.१९९/२ (अ), भुसावळ, जिल्हा जळगांव येथे २२ गाळे मध्यम उत्पन्न गट सदनिकांच्या बांधकामासाठी निम्नतम निविदाकार व्ही.पी.भंडारी यांनी प्रस्तावित केलेला दर हा चालू दरसूची २०११-१२ नुसार २८.९०% जादा आहे. सदर दर हा संयुक्तिक नसल्याने निम्नतम निविदाकार श्री.व्ही.पी.भंडारी यांनी भरलेली निम्नतम निविदा रद्द करण्यास व तदनंतर फेरानिविदा मागविण्यात प्राधिकरण मंजूरी देत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी इतिवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता तात्काळ करण्यात यावी.